**क्र.का.१२/मुद्रांक परतावा/२१२७-५६**
**नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, म.रा. पुणे १**
**दिनांक :- ४.१२.१९९२**

**प रि प त्र क :-**

**विषय :- मुद्रांकाच्या परताव्याबाबत.**

या कार्यालयाची परिपत्रके क्र. का.५/मुप/८८/३०३२-६२ दि. १७.१२.८८ व का. ५/मुप/८९/२९२८-३४२८ दि. ३१.५.८९ अन्वये मुद्रांकाच्या परतावा प्रकरणांची छाननी कशी करावयाची याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणांवरुन असे निदर्शनास येते की, परिपत्रकातील सूचनांचा योग्यप्रकारे अवलंब मुद्रांक जिल्हाधिकारी करीत नाहीत. रकमेबाबत चलनाची प्रत किंवा कोषागाराचे प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र असतानाही केवळ पुन्हा जबाबासाठी ८ ते १० महिने प्रकरणे प्रलंबित ठेवली जातात.

वर नमूद केल्याप्रमाणे परतावा प्रकरणी विलंब टाळण्यासाठी परतावा प्रकरणाची संपूर्ण माहिती अर्जासोबतच प्राप्त करुन घ्यावी. चलनाची प्रत वा प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र यावरुन खात्री पटल्यावर पुन्हा जबाब घेण्यासाठी प्रकरण प्रलंबित ठेवण्यात येऊ नये व प्रकरणे सात दिवसात निकाली निघतील याकडे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी कटाक्षाने लक्ष पुरवाने.

**का.प्र.नो.म.नि. यांच्या**
**सहीची असे.**

**सही/**
**( सु. शा. माळी)**
**उप नोंदणी महानिरीक्षक**
**म.रा. पुणे.**

**प्रति,**

**१. सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी.**
**२. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक.**
**३. मुद्रांक अधीक्षक, मुंबई.**
**४. सर्व कार्यासन अधिकारी.**